24-1-12.

Somehow I overslept myself this morning. This made me late for everything. I had to hurry through all my usual routine. Somehow Mr. Dixit also was late and everybody appeared to be in the same predicament. We saw Sayin Baba go out and then read Paramamrit with Upasani, Bhishma, and Bapusaheb Jog. I then went to the musjid to see Sayin Baba. Laxmibai Kawjalgi attended our Paramamrit class and went to the musjid after I reached. Sayin Baba called her his mother-in-law and made a joke about her saluting him. This gave me the idea that she has been accepted by him as a disciple. The midday Arti passed off in usual way rather quietly. On my return from it I found Mr. Sane, Mamletdar of Kopargaon, sitting in the varandah. He was doing revenue work in connection with the extention of Gaothan and removal of the cemetery and the burning ghat. After meal I tried to write a few letters but sat talking with Mr. Sane. Then Mr. Dixit read Ramayan and later on I went to the musjid to see Sayin Saheb, but as all were dismissed soon, I took Udi, and stood near the Chawadi. I met there the Mahamadan Kabirpanthi gentleman who came to Amraoti some time ago with Sathaye and Asnare. In the evening there was the Arti at the Wada and then Shej Arti at the Chawadi. I held the morchal as usual.

25-1-12.

Madhaorao Deshpande woke me up in the morning and said that he had to call me more than once before I answered his call. I prayed and attended the Kakad Arti. Sayin Baba walked to the musjid in silence. On return we held our Paramamrit class with Upasani, Bapusaheb Jog, Bhisma and Mrs. Kawlalgi. We finished the chapter on,

Mahavakya Vivek. Then we saw Sayin Saheb both when he went out and after he returned to musjid. The midday Arti went off as usual and Sayin Saheb gave me smoke very often. After meals I lay down for a while and then we had Ramayan. Dixit read it and later on went to see Sayin Baba. He was in a pleased mood. At night there was the Wada Arti, Bhishma's Bhajan and Dixit's Ramayan. I may mention the fact that in the evening at stroll time Sayin Baba told me nearly the whole previous history of Mrs. Laxmibai Kawjalgi, I knew it to be correct as I knew the facts.

26-I-12

In the morning I got up very early by myself, and miscalculating the time it wanted to sunrise, I said my prayers and walked up and down in the verandah. I thought I was before time by about an hour and a half. After sunrise I began the routine of life and we went out. We read a little of Paramamrit, saw Sayin Baba go out and again after he returned. I felt unwell so I lay down for a while.

27-I-12

I got up early in the morning, prayed and attended the Kakad Arti. Sayin Baba did not quite go to the Musjid without a word and yet he did not say much. I, Upasani, Bapusaheb Jog and Bhishma read Paramamrit, saw Sayin Baba go out and again after he returned. The midday Arti passed off easily and after it we had our meals as usual. I lay down a while, then wrote a letter, and attended afternoon Ramayana read by Dixit. We saw Sayin Baba at his stroll and he spoke pleasantly though in a serious mood. Towards its end he spoke loud and angry. I am told that after dark he spoke louder still making an occasion for the exhibtion of his anger of the fact that Ibrahim, the convert stood near

the Khind with his hands on the breach of the wall. Sayin Saheb's clothes were also washed by Radhakrishnabai and he was angry with her for having done so.

28-1-12

I slept very well last night and got up in time to pray before day break, and commence the routine of the day. I went about 8 p. m. to the temple of Khandoba where Upasani lives and sat talking with him. It is a nice little place. We held our Paramamrit class in the quarters of Bapusaheb Joga as talking and discussing vedanda subject in the verandah of my lodging disturbs my son Balvant. We saw Sayin Maharaj go out and again after he returned to the Musjid. He asked me how we spent the morning and I gave him an account of what we did. He appeared to be in a pleased mood and the midday Arti passed off easy except that Radhakrishnabai appeared to be put out and vexed and she closed the doors. So the Arti things could not be got at soon. After the midday meal I lay down for a while, then wrote a letter, and attended the Puran of Ramayan by Dixit. Then we went and saw Sayin Maharaj at his strcll in the evening. Then there was Wada Arti but no Bhajan as Bhishma was unwell. At night Dixit read Ramayan after we returned from Shej Arti.

ठाण्याचे सुप्रसिद्ध वकील रा. रा. नारायण घनःशाम सबनीस हे आजारी पडून कोंकणात गेले. तेथें त्यांची प्रकृति बरीच बिघडून ते अत्यावस्थ झाले. तशा स्थितींत त्यांना महाराजांनीं दर्शन देऊन आश्वासन दिलें कीं, तूं आतां बरा होशील दुसऱ्या दिवसापासूनच दुखण्याला उतार लागला व ते लौकरच साफ बरे झाले. सबनीस हे वेळोवेळीं महाराजांचे दर्शनास येत. त्यांचे कडून महाराजांचे नांवावर कधीं कधीं पत्रें येत त्यांपैकीं एक पत्र माझ्या पाहाण्यांत आलें, त्यांतील उतारा खालीं देत आहें.

" लिहिण्यास कारण कीं, आपले आशीर्वादें करून दोन्ही मुलगे पास झाले, या बद्दल आपले आम्हावर फारच उपकार आहेत........... ठाणे येथें प्लेग आहे पण आपण फोटोचे रूपानें आमच्या बरोबर आहां यामुळें आमचे कुटुंबांत कोणासही कशाचीच भीति वाटत नाहीं. आपल्या फोटोचे दर्शनाने सर्व सुख व आनंद आहे........थोडीं फळें पाठविलीं आहेत त्यांचा स्वीकार व्हावा. दक्षणा रुपये दहा पाठविले आहेत."

## रा. रा. अनंत महादेव कुळकर्णी शिंगवे यांचें पत्र.

कृतानेक सा. न. वि. वि.

माझे वडील मधील भावास आलेला श्रीसाईमहाराज शिरडी यांचा अनुभव खालीं लिहिल्याप्रमाणें सादर करीत आहें.

माझे वडील हे १९१४ सालीं एकदां आमचे येथील मुलकी पाटील श्री. खासगीवाले यांचेकडे कांहीं कामासाठीं शिरडीस गेले. त्यांचेबरोबर माझे बंधूही गेले, त्या वेळेस ते नुकतेच मराठी सातव्या यत्तेची परिक्षा देऊन घरीं आले. वडिलांनीं शिरडीस येतोस काय म्हणून विचारतांच त्यांनीं शिरडीस जाण्याची तयारी वडिलांबरोबर केली. शिरडीस दाखल झाल्यावर दोघे बापलेक महाराजांचे दर्शनास गेले. त्यांनीं बाबांची कीर्ति वडिलांचे तोंडून ऐकली होती. तेव्हां बंधूस वाटलें कीं आपण बाबांस आपले परिक्षे-

बद्दल विचारावें म्हणून ते त्यांचेजवळ गेले व विचारलें कीं, ' महाराज यंदा मी सातवीचे परिक्षेला बसलों आहें, तींत पास होईन काय !' असें विचारतांच महाराज म्हणाले 'तुझा ११४ नंबर येईल; पास होशील जा.' तेव्हां मला आश्चर्य वाटले कीं, रिझल्ट लागण्याचे आधींच बाबांनीं ' तुझा नंबर अमकाच येईल. असें कसें सांगितलें ? नंतर तेथून उठून जाऊं लागलों तों त्यांनीं त्यांना प्रसाद म्हणून थोडासा पेढा दिला. व नंतर वडील व ते घरीं परत आले; झालेली सर्व हकीगत वडिलांनीं व बंधूंनीं मला सांगितली. पुढें कांहीं दिवसांनीं रिझल्ट लागला त्यांत आमचे बंधूंचा नेमका बाबांच्या बोलण्या-प्रमाणेंच नंबर आलेला पाहून आम्हा सर्व मंडळीस बाबांचे भविष्याबद्दल फार आनंद झाला, तो सांगतां येणे शक्य नाहीं.

**सही—आ० अनंत महादेव कुळकर्णी सिंगवेकर यांची**

श्रीसाईलीला ऑफिस बांद्रे.

म्यानेजर साहेब यांस चेहेडीहून लक्ष्मण रामजी आबारे यांचा रामराम वि. वि.

मी राहाणारा मौजे ताजनपुरची चेहेडी ता० जि० नाशिक, पोष्ट नाशिक रोड. माझें गांव नाशिक स्टेशन पासून एक मैलाचे अंतरावर पूर्व बाजूस सिन्नर रस्त्याकडे आहे. मला श्री० शिरडी येथील साईबाबा यांचा अनुभव आलेला आहे. तो आपले मासिकांत दाखल करावा अशी माझी गरीबाची विनंती आहे. तो अनुभव खालीं लिहिल्याप्रमाणें.

माझे डोळे आल्याचें निमित्त होऊन माझे डोळयांस ठणका लागून वडस वाढलें—त्यामुळें डोळ्यांस सारखी पाण्याची गळ लागली होती. असे ६ महिने लोटले त्यामुळें मला डोळ्यांनीं अगदींच दिसत नव्हतें. फारतर काय दिव्याचा किंवा सूर्याचा प्रकाश दिसत नव्हता. त्या अवधींत कांहीं लोकांकडून अशी खबर आली कीं, शिरडीस सांईबाबा नांवाचे महान अव-

लीये व साधू आहेत. त्यांचेकडे गेल्यास तुमचे डोळ्याला आराम पडेल. त्यांच्या सांगण्यावरून मी व माझ्या मातोश्री यांनीं शिरडीस जाण्याचा बेत केला. आम्ही गुरुवारीं तेथें येऊन दाखल झालों. त्यावेळीं समाधीमंडपांतील फरसी बसविण्याची ठरली होती व त्या वेळेस जमीन खणण्यास सुरुवात झाली होती. तें साल व महिना आपले ध्यानांत येईल. महाराजांचे पायांवर माझे आईनें माझा हात धरून माझें डोकें टेकवलें. महाराजांनीं उदी दिली व " अल्ला अच्छा करेगा " म्हणून आशिर्वाद दिला. नंतर आम्ही आपल्या गांवीं परत आलों. गांवीं आल्यावर माझे डोळ्यांची गळ व ठणका राहिला. त्या उमेदीवरून आम्ही प्रत्येक गुरुवारीं येऊन महाराजांच्या दर्शनाच्या वाऱ्या सतत वर्षभर केल्या. ६ महिने लोटल्यानंतर गांवांतील कांहीं मंडळींनीं माझे मातोश्रीस सांगून तिचें मन वळवून मुंबईस वाटली-वाल्याचे इस्पितळांत डोळ्याचे उपचाराकरितां पाठविलें. तेथें गेल्यावर गोऱ्या डॉक्टर साहेबांनीं माझे डोळे एक तासभर तपासले व असा शेरा दिला कीं, तुझे डोळे नीट होणार नाहींत. आमचा मुंबईस जाण्याचा बेत झाला त्याच दिवशीं माझे सर्व अंगाला केसतोडासारखे फोड उठले होते. तरी पण आम्ही तिकडे लक्ष न देतां तसेंच निघून गेलों. नंतर आम्ही तेथून निघून आपले गांवीं आलों व डोळे जावोत अथवा राहोत असा मनाचा निग्रह करून शिरडीस बाबांचे चरणापाशीं येऊन राहिलों. नंतर माझी आई मला तेथेंच ठेवून गांवीं परत आली. मी गांवांत कांहीं दिवस माधुकरी मागत होतों. कधीं कधीं बाबांचा प्रसाद मिळत होता. तेथें माझा नित्यक्रम असा होता कीं, बाबा सकाळीं तोंड धूत असतांना जें पाणी खालीं पडे तें पाणी घेऊन त्यानें मी आपले डोळे धूत असें. असें करतां करतां मला एक महिन्यानें साधारण दिसूं लागलें. ज्यावेळेस संध्याकाळीं बाबा चावडीपुढें उभे रहात व तेथें मंडळी दर्शन घेत. त्यावेळेस मीही रीतीप्रमाणें दर्शन घेत असें. त्यावेळेस एकदां श्री. बाबांनीं माझे उरावर दोन्ही हातांनीं थाप मारली. त्यावेळेपासून मला साफ दिसावयास लागलें.

तेव्हांपासून बाबा समाधिस्त होत तोंपर्यंत मी शिरडीसच राहिलों. त्यावेळीं मातोश्री राधाकृष्ण बाईनीं मला पंपावर पाणी उपसाचें कामावर १ वर्षभर लावलें होतें. पुढें मी बाबांचें पडेल तें काम नेहमीं करीत असें. बाबांचे नांवाने मुंबईहून व इतर ठिकाणावरून पारसलें येत तींही मी लोकांचे मदतीशिवाय घेऊन येत असें. हेंही काम ५।६ महिने करीत असें. येणेंप्रमाणे माझा अनुभव आहे.

आंगठ्याची
निशाणी

सहीची निशाणी डावे हाताचा आंगठा.
लक्ष्मण पाटील रामजी आवेर याचा असे.
दस्तुर अनंत महादेव कुळकर्णी सिंगवेकर.

माझ्या डोळ्यांच्या आंधळेपणामुळें महाराजांचें कामकरी (सेवेकरी) मंडळींनीं माझें नांव सूरदास असें ठेविलें होतें, व ह्या नांवानें मला तेथें हांका मारीत असत.

महाराजांचा बोध पुष्कळदां गोष्टींच्या द्वारें किंवा लहानलहान तुटक-वाक्यांचे द्वारें होत असे. त्यांच्या गोष्टी ऐकतांना श्रोते आनंदित होऊन तटस्थ होऊन जात. त्या गोष्टींचें पूर्णपणें आकलन कोणालाही होत नसे. सबंध गोष्ट जशीच्यातशी कोणाचेंही लक्षांत राहत नसे. इतकेंच नव्हे तर एकाच गोष्टीचे निरनिराळे लोक निरनिराळे तऱ्हेचे अर्थ करीत. जो तो आपापल्या परिस्थिती प्रमाणें आणि मनोवृत्ती प्रमाणें अर्थ करी. महाराजांनीं सांगितलेल्या कांहीं गोष्टींचे आणि वाक्यांचें टिपण माझ्या संग्रहाला आहे. तें वाचकांच्या पुढें सादर करण्याचा विचार आहे. एखाद्या गोष्टीचें रहस्य सुचल्यास तें जसें सुचेल तसें देण्याचा विचार आहे. अर्थात टिपण किंवा रहस्य यथायोग्य आहे अशी खात्री मला देतां येत नाहीं. श्री साईलीलेच्या वाचकांपैकीं कोणी या पैकीं कांहीं गोष्टी ऐकल्या असल्यास आणि त्यांचें रहस्य त्यांना कांहीं सुचलें असल्यास त्यांनीं मला कळविण्याची कृपा करावी.

एकदां महाराज म्हणाले, 'मला रात्रीं स्वप्न पडलें. त्यांत मी वडवडावयाला लागलों. नंतर जागा झालों उठून बसलों. कांहींचें कांहीं दिसावयास लागलें. संशय येऊं लागले. गहूं आणवून दळण सुरू केलें. तेव्हां संशय गेले आणि बरें वाटलें.'

## ता. १३-४-१५ च्या रात्रीच्या बैठकींत

एक खत्री होता. त्याला दोन मुलगे होते. शिवाय त्याचे आईबाप होते व बायकोही होती. ते दोन मुलगे मेले. त्यांची आई व आजी रडूं लागली. म्हाताऱ्यानें समजूत केली. त्यांच्या वाड्यांत एक माणूस रहात होता. त्याचीं कांहीं सणगें होतीं. त्या सणगांत त्या मेलेल्या मुलाची सावली खेळूं लागली. मीही जवळ होतों. मी म्हटलें 'तीं सणगें तुम्ही आपल्याजवळ ठेवा. त्या मनुष्याला देऊं नका. त्याला पाहिजे तर त्याची किंमत द्या.' म्हातारीनें सणगें मांडीवर घेतलीं तेव्हां त्यांत मुलांची सावली दिसूं लागली. मग सणगांची किंमत देऊन टाकिली. मी म्हटलें तीं सणगें आपल्या सणगांत ठेवा. पुढें बारा महिन्याचे आंत पहिलें मूल आपल्या आईच्याच पोटांत आलें व दुसऱ्या बारा महिन्यांनीं दुसरें मूल पोटांत आलें. मग मी म्हटलें त्या माणसाला घालवून द्या. त्यानेंच पहिलीं दोन मुलें घेतलीं. तो दंड माणूस होता. लवकर निघेना. मग म्हातारीनें बाहेर जाऊन पंचात केली आणि शिपाई घेऊन आली त्या शिपायानें त्याला घालविलें. मग तीं मुलें वाचलीं. अशी अल्लामियाची करिमी असते. आणि आम्ही असे फकीर आहोंत.

ज्याची निष्ठा चांगली त्याचें कल्याणच होईल.

### रा. रा. गणपतराव नरके यांनीं रा. रा. काकासाहेब दीक्षितांस पाठविलेल्या पत्रांतील उतारा:—

नि॥ काकासाहेब यांस साष्टांग नमस्कार. काल सकाळीं श्री समर्थांनीं सांगितलेली गोष्ट ह्या सोबत पाठविली आहे. मी हजर नव्हतो. मला वझ्यांनीं सांगितली.लिहिल्यावर त्यांना दाखवून आपलेकडे पाठवीत आहे.

**सकाळची गोष्ट.** ता. १३-४-१९१८

रोशनगांव व देवगांवचे मध्यें एक नाला आहे. आम्ही बारान् बारा वर्षें फिरतां फिरतां तेथें गेलों. खायला कोणीं आंबे आणून दिले. त्याच्या कोया लावल्या. दोनतीनशें झाडें लाविलीं. अल्लामियाची करणी; तीं आठ दिवसांतच चांगली वाढून आलीं. मोठीं दिसायला लागलीं. दोन चार वर्षांतच चांगला मोहर आला. कोणी म्हणायला लागले बाबा हा मोहर झाडून टाका; लवकरच मोहर आला तर आंबे कांहीं चांगले यायचे नाहींत. मी म्हटलें, 'मी आपले हातांनीं झाड लाविलें. त्याचा मोहोर कांहीं झाडायचा नाहीं. मोहोर तसाच राहूं दिला. एक मांग राखण ठेवला. त्या मोहराचे खूप मोठाले आंबे आले. सर्वांनीं खाल्ले. देवगांवांत मोठेमोठे श्रीमंत लोक होते त्यांनीं व सगळ्यांनीं आंबे खाल्ले. त्या गांवचे आंबे एथेंही आणले. त्यांतल्या कांहीं कोया मीं आप्पा कोत्याला दिल्या आणि त्यानें त्या लावल्या. तेथें ह्या फकीरानें ( बडे बाबा ) जागा घेतली. पण हा कांहीं चांगला निघाला नाहीं. नंतर तेथें एक ब्राह्मण आला. तोन त्याची बायको असे दोघे होते. त्यांनीं तेथें घर बांधलें. ब्राह्मण मोठा उद्योगी होता. मी एकदां त्याचे घरीं गेलों होतों. ब्राह्मण घरीं नव्हता. कोठें बाहेर गेला होता. दोही बाजूला पैशाचे ढीग पडले होते. पुढें त्याचें फार चांगलें झालें. त्याला ईश्वर पावला. तेथून मी निघालों व गावांला गेलों. तेथून बीडला गेलों. पुढें एक जंगल लागलें. मी परत बीडला आलों. तेथें मग कंटाळा आला व तेथून इथें आलों.

दुपारीं फकीरबाबांला पोंचवून आल्यावर गादीवर बसतांना लिंबोण्याकडे बोट करून बाबा मोठ्यानें आपल्याशींच म्हणाले, 'माझा बच्चा . नागवा अन् खाकेंत झोळी असा हा असा गेला. अन् त्याला मारून टाकला. साता समुद्रा पलीकडे गेला असला तरी मी त्या मारणाराला पाहून घेईन.'

## श्री समर्थ साई बाबा समर्थ

कवि:—गजानन शिवराम खळे

### अभंग १

मन इच्छी हेंची नित्य तुझी सेवा। शिरडीवासी देवा। साई बाबा ॥ १ ॥ कारण जें झालें जन उद्धराया। आठवूं त्या पायां दिवानिशीं ॥ २ ॥ नेत्रा लागो चाळा पहावें तुझें ध्यान। रंगावें हें मन भजनामाजी ॥ ३ ॥ लागो नित्य ध्यास तुझीया नामाचा। आणिक हे वाचा कांहीं न वदो ॥ ४ ॥ गजानन म्हणे ठेवीलासे माथा। सद्गुरु साईनाथा। पायांवरी ॥ ५ ॥

### अभंग २ रा.

चला शिरडी जाऊं। डोळे भरुनी बाबा पाहूं ॥ १ ॥ घेतां समाधीचें दर्शन। सहज हरुनी जाये शीण ॥ २ ॥ जमा होती समाधीपाशीं। हिंदू यवन पारशी ॥३॥ तेथें कैंचा भेद भाव। सर्वांभूतीं सांई देव ॥४॥ सर्व धर्म एक झाले। सांई बाबा पायीं ठेले ॥ ५ ॥ उद्धराया पतीत जन। केलें शिरडीग्रामीं ठाण ॥ ६ ॥ शिवसुत गजानन। म्हणे तया मी शरण ॥ ७ ॥

### अभंग ३ रा.

आला विजया दशमी दिन। जाऊं चला शिरडी जन ॥ १ ॥ बाबांची पुण्यतिथी। भावें भक्तजन करिती ॥ २ ॥ कलियुगीचें साधन। साई बाबांचे चरण ॥ ३ ॥ आदीनाथ साई मूर्ती ॥ वदले श्रीराम मारुती ॥ ४ ॥ उद्धराया जडजीव। आला शिरडीं रमाधव ॥ ५ ॥ गजानन म्हणे वंदूं। साईनाथ दीन बंधू ॥ ६ ॥

### अभंग ४ था

आम्हा लाभलें निधान। सांई बाबांचे चरण ॥ १ ॥ आदीनाथाचा अवतार। सांईनाथ गुरु दातार ॥ २ ॥ काय सांगों आधिकार। चारी मुक्तींचें माहेर ॥३॥ धरुनी यवन आकार। शिरडीं आला कमलावर ॥४॥ साई नोहे व्यक्ति सहान। पायीं लीन गजानन ॥ ५ ॥

## माझा बाबांच्या भक्त मंडळींशीं परिचय.

मला ओळखणारे एक साई बाबा व त्यांचे शिष्य राजमान्य राजश्री हरी सीताराम दीक्षित होत. बाकीच्यांना ओळख पटण्यासाठीं खालीं माझा थोडका इतिहास देत आहे.

माझे वडील कैलासवासी शिवराम बाळकृष्ण खळे हे रा. रा. दीक्षित त्यांच्या आफीसांत १८ वर्षें टाईपीस्ट होते. त्यानंतर मी त्यांच्या आफिसांत एक महिना प्रोबेशनवर होतों. पण माझें दुर्दैव कीं मला व आमच्या सर्व कुटुंबास दु:खांत लोटून माझ्या वडिलांनीं स्वत: अक्षय सुखाचा लाभ घेण्यास परलोकीं प्रयाण केलें. त्यानंतर मी बरेच दिवस नोकरी धंद्यारहित होतों. पण श्रीसमर्थ साईबाबांच्या कृपेकरून व रा. दिक्षीतांच्या आशीर्वादेंकरून मी सांप्रत मेसर्स कनुभाई आणि शास्त्री नांवाच्या सॉलिसीटरच्या कंपनींत नोकरी करीत आहें. वरील अभंग श्रीच्या प्रेरणेनेंच करून त्यांच्या चरणीं अर्पण केले आहेत.

## श्री. गुरु साईश प्रभु.

विजया दशमी १८४६

पद.

" सकल गुणनिधान सांई ॥ " हीं १० अक्षरें पदाचे प्रत्येक आद्य अक्षर प्रत्येक चरणासीं साधलें आहे. ( ण च्या ठिकाणी नचा उपयोग करण्याची पद्धत पूर्वापारचीच आहे; पहा एकनाथ महाराजाच्या अभंगाची गाथा (आपले गुरूची स्तुती ओवी ४३ ) :-

स-कल गुण निधान सांई । प्रेम भरे तूं मनारे ध्याई ॥ धृ० ॥

क-वण्या बोधें बोधूं आतां । हितकर मार्गीं जावें ताता ।
विनवूं किती तुज हें गुणवंता । पशुनच राही ऽऽ ॥ १ ॥

ल-क्ष चौऱ्याशीं फेरे फिरतां । नर देहाची गांठी× अवचिता ।
पुण्यें** अगणित पदरीं असतां । संत गृहा पाही ऽऽ ॥ २ ॥

× किंवा गाठी असें वाचणें. ** किंवा पुण्यें असें वाचावे.

गु-ण अवगुण ते जावे विलया । वाटे ऐसें तुजला सखया ।
तरि भजभजरे सद्गुरु पाया । लाभ करीं[1] येई ऽऽ ॥ ३ ॥

ण- (न)- च लागत ही संतत[2] संपत[3] । आत्महित हा लाभ सदोदित
संतासीं जो प्रेमें अर्चित[4] । मिळत मुक्ति भाई ऽऽ ॥ ४ ॥

निं[5]-कट वास सुवास करीरे । स्नेहासि[6] तो वास्त कसारे ।
मलयागिर[7] तो खैर[8] होइरे । संत संग झणि घेई ऽऽ ॥ ५ ॥

धा-रोष्ण[9] पय हें प्राशन करितां । कांतीवर्धक[10] होय तत्त्वतां ।
त्यापरि चरणामृतही मिळतां । सफल जन्म होई ऽऽ ॥ ६ ॥

न-व मास भरी उदरीं उकडी । सोहं सोहं बोल कडकडी ।
बाहेर येतां कोहं काढी । ऐसी दशा कां? ही ऽऽ ॥ ७ ॥

## श्रीचरणीं प्रार्थनापर मागणें.

सां-भाळावें सकल जनाला । भक्ति प्रेम तें लागो मजला ।
सर्वा भूतीं तूंचि नटला । ऐसें देणें देई ऽऽ ॥ ८ ॥

ई-शा तव आजि पुण्य[11] दीन तो । अवातारांची[12] संख्या वदतो ।
सोमनाथीं[13] प्रती दीसतो । शाम[14] देई ग्वाही ॥ ९ ॥

---

**टीप** :—अक्षरावरील खुणांचे आकड्यांसहित स्पष्टीकरण ।

१ हातांत. २ मुलेबाळें. ३ द्रव्य. ४ पुजा करणें. ५ जवळ ( नजीक ). ६ तेलासी ( ला ). ७ चंदनाचें झाड. ८ एका झाडाचें नांव. ९ ताजें दूध. १० तेजःपुंज किंवा ( आयुष्यवान् ) ११ उत्तम दिवस. १२ दहा अवतार. १३ किंवा—सोमनाथां असे वाचणें; किंवा सोरठीं सोमनाथ लिंगाचे ठिकाणीं श्रींची मूर्ति. १४ या देहाचें नांव; जास्त खुलासा श्रीसाई लीला वर्ष १ अंक २ आद्यमस्तकीं पहा. ( श्री उद्धवेशबुवा ) प्रभासपाटण.

## श्रीसाईबाबांचे बोल.

आलास कशाला ! गवऱ्या वेचायला !

मालकाला ओळखलें पाहिजे.

चारशें माणसें चावडींत होतीं. तिसरे प्रहरीं गाडया आल्या व ते गाडीवाले म्हणाले हें धन तुमचें आहे. तुम्ही मालक आहांत. मग तें भिंतींत रचून ठेवलें.

एका एका बाजूस दोन दोन मांग ठेवले.

वाडयांत बसलेल्याला ओळखलें पाहिजे.

रहेनाम अल्लाका.

सब अल्ला अल्लाही है.

लोकांचें मनशिक कोठें चांगलें आहे ?

मनशिक चांगलें पाहिजे.

चौघांचे मुडदे पाडीन ( चारी देहांचे ).

रोहिला रात्रभर त्रास देतो अशी तक्रार झाल्यावर.
उत्तर—त्याची बायको अनावर झाली आहे. ती मला सतवायला येते पण याच्या ओरडण्यानें पळून जातें व मग मला झोंप लागते.

पैठणास होतों. चार हजार लोक बावन वराडांतले पंढरपुरास जाण्यास आले. मी त्यांचे मागून गेलों. बीडला गेलों. तेथें ते पुढें गले. मी मागाहून गेलों तों जंगलांत गेलों. त्यांचा पत्ता लागेना. बिडास परत रात्रीं अकरा वाजतां आलों. तेथें सग्यामध्यें राहिलों. तेथून भगवानदासच्या येथें राहिलों एक महिनाभर.

## संस्थान शिर्डी येथील शके १८४६ चा गुरुपौर्णिमेचा उत्सव.

सालाबादप्रमाणे यंदाही श्री गुरुपौर्णिमेचा उत्सव शिर्डी मुक्कामीं मोठ्या भक्तीनें व थाटानें साजरा करण्यांत आला. एक दोन दिवस अगोदर पासूनच मुंबई, नागपूर, खांडवा, नाशिक पुणे वगैरे ठिकाणाहून श्री साईबाबांची बरीच भक्त मंडळी उत्सवासाठीं आली होती. त्यांत या उत्सवाचे मालक श्रीमंत पूर्णचंद्र भय्या बुटी, श्रीयुत काकासाहेब दीक्षित, श्री. अण्णासाहेब दाभोळकर, भाऊसाहेब धुमाळ, श्री. डॉक्टर खासगीवाले, श्री. आत्माराम बाळाजी, श्री. काकासाहेब रांगणेकर, श्री० बाळासाहेब रेगे व त्यांचे दोन बंधु, श्री. पुरंदरे, श्री. डोळस आपल्या परिवारासह पुणेकर, श्री० दुबे वगैरे बरीच मंडळी होती.

ता. १५-७-२४ रोजीं तिसरे प्रहरीं ४ वाजतां शिर्डी संस्थानच्या व्यवस्थापक मंडळीची सभा श्री० बाळासाहेब रेगे यांच्या अध्यक्षत्वाखालीं झाली. त्यावेळीं संस्थानचा वार्षिक रिपोर्ट आणि जमाखर्चाचा आढावा हे सभेस सादर करण्यांत आले आणि सभेनें ते मजूर केले.

हा वार्षिक रिपोर्ट व हा आढावा या मासिकाच्या २ रे वर्षाच्या श्रावणच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.

रात्रौ १० पासून १ पर्यंत श्री. बाळासाहेब रेगे यांचे श्रीचे समाधी-पुढें श्रीसंततुकाराम चरित्रावर भक्तिपूर्ण, प्रेमळ व सर्वतोपरी सुश्राव्य कीर्तन झालें.

त्यानंतर श्रीची शेजारतो होऊन त्या दिवसापुरता कार्यक्रम आटोपला.

दुसरे दिवशीं गुरुपौर्णिमेचा दिवस. प्रातःकाळीं काकड आरतीची घंटा वाजल्याबरोबर सर्व मंडळी समाधीजवळ गोळा होऊन मोठ्या थाटानें काकडआरती झाली. त्यानंतर समाधीला संस्थानाकडून व भक्तमंडळीकडून खासगी तऱ्हेचे असे ११ अभिषेक म्हणजे एक लघुरुद्र झाला. हें अभिषे-काचें काम सकाळचे सुमारें ११ वाजेपर्यंत चालू होतें. अभिषेकानंतर समाधीला पंचामृताचें व उष्णोदकाचें स्नान घातल्यावर समाधी पुसून नंतर

गलेफ व फुलांचे शेरे चढविले. समाधीवर फुलांचा मांडव केला असून भक्त मंडळींनीं आणलल्या रंगीबेरंगी गोळ्यांनीं समाधीच्या जागेस विशेष शोभा आणली होती. समाधीची पूजा आरती होऊन सर्वांस प्रसाद वाटी-पावेतों दुपारचे २ वाजले. बहुतेक मंडळींनीं श्रीगुरूस वस्त्रें अर्पण केलीं.

रात्रौ सुमारें ९॥ वाजेपासून रथाची मिरवणूक निघाली. रथास उत्तम प्रकारें सजवून आंत श्रीसाईबाबांची तसवीर ठेवली होती. पुढें सुस्वर वाजंत्र्यांचा ताफा होता. छत्र, चामरें, अबदागिरी वगैरे सर्व यथास्थित होतें. रथाबरोबर भजनी मेळे, दिंडया व मंडळींचे थवे चालत होते. वेळो-वेळीं श्रीसाईनाथांच्या जयजयकाराच्या गर्जनेनें भक्तमंडळींचीं अंतःकरणें प्रमानें उचंबळून येत. जागजागीं मंडळींनीं प्रेमानें मिरवणूक थांबवून श्रीच्या तसबीरीची पूजा करून आरत्या ओवाळल्या. भगत म्हाळसापतीच्या घरापलीकडील पटांगणांत बराच वेळ रथ उभा करून लांबलांबून आलेल्या भजनी मंडळीचे व गांवच्या मंडळीचें भजन फार उत्तम झालें. तेथून मिरवणूक जी निघाली ती श्री. काकासाहेब दीक्षित यांचे वाडयास-मोर आल्यावर तेथें रथ थांबवून चांगले दोन तासपर्यंत भजन, गांवकऱ्यांचें ललीत, गारुड, आणि मुक्काम खोपडी ता. कोपरगांव येथील प्रसिद्ध तुकाराम मथाजी गुरव यांच्या निवडक नकला झाल्या. अशा थाटानें रथाच्या मिरव-णुकीचें काम बरीच रात्र होईपर्यंत झालें.

मिरवणूकीनंतर श्रीसाईबाबांची शेजारती करून मंडळी विश्राम करण्यास गेली.

दुसरे दिवशीं म्हणजे ता. १७।७।२४ रोजीं अन्नसंतर्पण झालें. गोरगरिबांस अन्नदान दिलें. सुमारें एक हजार पात्र झालें असेल. रात्रीं चावडींत थाटाची मिरवणूक गेली व शेजारती झाली.

दुसरे दिवशीं नेहमीप्रमाणें काकडआरती झाली आणि सकाळीं नवाचे सुमारास काल्याचें कीर्तन सुरू झालें.. तें कीर्तन रा. रा. बाप्पाजी

लक्ष्मण कुळकर्णी यांनीं केलें. त्यांचा हा पहिलाच प्रसंग होता. तरी महाराजांचे कृपेनें कीर्तनास रंग चांगला आला होता.

याप्रमाणें श्रीसाईबाबांच्या कृपेनें हा उत्सव निर्विघ्न पार पडला. हा उत्सव शिर्डीस सुरू झाल्यास १६ वर्षें झालीं. आर्यांची उत्सवप्रियतेबद्दल मोठी ख्याति आहे. आर्यांच्या इतके उत्सव दुसऱ्या कोणत्याही देशांत व धर्मांत आढळणार नाहींत. आमचे उत्सव संख्येनें पुष्कळ आहेत येवढेंच नव्हे, तर त्यांत विविधताही फार आहे. प्रत्येक उत्सवांत कांहीं तरी नवीन खुबी व नवीन तत्त्व ग्रथित झालेलें सूक्ष्म विचारांतीं आढळेल. दुसरी गोष्ट अशी कीं, कोणताही उत्सव निव्वळ सामाजिक स्वरूपाचा कधींच नसतो. प्रत्येक उत्सव कोणत्यातरी देवतेनिमित्त केला जातो; म्हणजे आमचा प्रत्येक उत्सव धर्माच्या पायावर उभारलेला आहे. अशा उत्सवाच्या संख्येचें व विविधतेचें परीक्षण केल्यास आस्तिक्य बुद्धि अधिकाधिक वाढावी, धर्मावरील श्रद्धा दृढमूल होत जावी, परस्पर द्वेषभाव व मत्सर दूर होऊन ऐक्यसंवर्धन व्हावें, स्वार्थत्यागाचा धडा मिळावा, परमतसहिष्णुता अंगांत बाणावी, प्रवास होऊन अनायासें बहुश्रुतपणाचा लाभ व्हावा, इत्यादि अनेक उद्देश आर्यांच्या सणांत व उत्सवांत आढळून येतील. पण आजकाल सर्व गोष्टीप्रमाणें उत्सवांसही शैथिल्य प्राप्त झालें आहे. यांत काय आहे ? त्यांत काय आहे ? असेंच म्हणण्याची लोकांची प्रवृत्ति दिसून येते. त्यांना कशांतच कांहीं राम दिसत नाहीं. हीं र्‍हासाची स्पष्ट लक्षणें होत. तेव्हां हें शैथिल्य दूर करण्यासाठीं धर्मावर चढलेले कीट जाळून त्याचें मुळचें उज्वल स्वरूप प्राप्त करून देण्यासाठीं आर्यधर्माचा, आर्य संस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येकानें—मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, वृद्ध असो अथवा बाल असो—प्रयत्न केला पाहिजे; आणि या महत्कृत्याचा आरंभ उत्सवांत भाग घेऊन, त्यांना नीट व्यवस्थित स्वरूप देऊन केला पाहिजे. असो. श्रीसाईबाबांच्या कृपेनें प्रत्येक भक्ताच्या मनांत आपल्या धर्माबद्दल दिवसेंदिवस अधिक प्रेम व श्रद्धा उत्पन्न व्हावी व असे उत्सव निरंतर वाढत्या उत्साहानें होवोत, अशी प्रार्थना करून हा लेख संपवितों.

## श्री संस्थान शिर्डी येथील शके १८४६ चे गुरुपौर्णिमेच्या उत्सवाचा हिशेबः—

**जमा**

५०० श्री. केशवराव गोपाळराव बुटी व बंधू यांजकडील वर्गणी

३४२।।।= किरकोळ वर्गणी

७३।।≡।। श्रीसमर्थांचे पेटींत उत्सवाचे दिवसांत पडलेली रक्कम

९१६।।-।।·

**खर्च**

-।= हिशेब ठेवण्यास चोपडी

३०।। श्रीच्या गलेफास खर्च

२१ साटीन वार ७

९।। फीत वार १५

३०।।

५ फुलांचा शेरा

१२ खैरात

१० किरकोळ

२ तुकाराम गुरव

१२

१। अभिषेक खर्च

१ दक्षिणा खर्च

२८८= आचाऱ्याचा खर्च व पगार

५।।।≡ चहाचा डवा

१३। गोडें तेल

२१८≡।। देवस्थानाकडून पूजेचे सामान वगैरे घेतलें त्याबद्दल आणि देवस्थानाचे पांच दिवसांचे खर्चाबद्दल देवस्थानास दिले ते

३०५।-।।। भोजन खर्च

१९-।-। पोष्टखर्च

१।। प्रसादाचे लेबल्सची किंमत;

१७।- प्रसादानिमित्त खर्च; पिशव्या तयार करविणें, पोस्टेज वगैरे

४६२८-।।

४५४।। शिल्लक

६।।-।।

# अध्याय २२ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
श्रीसद्गुरुसाईनाथायनमः

जय सद्गुरो आनंदघना । ज्ञान स्वरूपा परम पावना ॥
जयजयाजी भवभय निकंदना । कलिमलदहना परिपूर्णा ॥ १ ॥
तूं आनंदसागर तुजवरी । उठती नाना वृत्ति लहरी ॥
त्याही तूंच तूंच आवरी । कृपा करी निजभक्तां ॥ २ ॥
अल्पांधारींचा जो साप । तोच प्रकाशीं दोर आपाप ॥
अल्पांधार प्रकाश स्वरूप । दोहींचा बाप तूं एक ॥ ३ ॥
सर्पाकार वृत्तीचा जनिता । तिजलाच दोराचा आकार देता ॥
तूंच भीतीतें उत्पन्नकर्ता । अंतीं निवारिताही तूंच ॥ ४ ॥
आधीं जेव्हां पूर्णांधार । नाहीं सर्प नाहीं दोर ॥
वृत्ती उठाया नाहीं थार । तोही निराकार तूं होसी ॥ ५ ॥
पुढें निराकाराचा आकार । तोही अल्प प्रकाशाचा अवसर ॥
तेणें आभासूं लागला विखार । आभासा कारणही तूंच ॥ ६ ॥
ऐसा दृश्यादृश्य भाव । हा तंववृत्यानंद प्रभाव ॥
भावाभावरहित स्वभाव । नलगे ठाव कवणाही ॥ ७ ॥

---

१ थोडा अंधार व थोडा प्रकाश अशा स्थितींत. २ आपल्याआपण. ३ जनिता, उत्पादक. ४ सर्प. ५ तुझ्या वृत्तीच्या आनंदाचा प्रभाव.

श्रुति शिणावल्या ऐशियास्तव । अशेष मुखांही करितांही स्तव ॥
शेषही नेणें स्वरूप वास्तव । तें मी कवण जाणावया ॥ ८ ॥

बाबा तव स्वरूप दर्शना । वांचून कांहीं रुचेना मना ॥
वाटे आणावें तेंच ध्याना । ठेवावें लोचनासमोर ॥ ९ ॥
केवळ शुद्धज्ञानमूर्ति । व्हावया आत्यंतिक सौख्यपूर्ती ॥
नाहीं तुझिया पायापरती । आणिक गती आम्हांतें ॥ १० ॥
काय ती तव नित्याची बैठक । दर्शना येती भक्त अनेक ॥
ठेवूनिया पायीं मस्तक । प्रेमें निजसुख लूटित ॥ ११ ॥
तोही तुझा पाय कैसा । शाखाचंद्र न्याय जैसा ॥
पादांगुष्ट कवळी तैसा । दर्शन जिज्ञासा पूरवी ॥ १२ ॥
कृष्णपक्षाची पंचदशी । अमावास्या अंधारी निशी ॥
उलटतां चंद्रदर्शनाची असोसी । होते सकळांशीं साहजिक ॥ १३ ॥
सरतां वद्य पक्षाची निशा । चंद्रदर्शनीं उपजे आशा ॥
जो तो अवलोकी पश्चिम दिशा । दृष्टी आकाशा लावुनी ॥१३॥ (अ)
ती निजभक्तांची असोसी । पुरविसी निज पायांपासीं ॥
वामजानूवरि दक्षिण पायाशीं । ठेवूनि बैससी जे समयीं ॥ १४ ॥
वामकर तर्जनी मध्यमांगुळी । शाखा वेचकें अंगुष्ट जो कवळी ॥
त्या दक्षिणपादांगुष्टाजवळीं । नखचंद्र झळाळी बीजेचा ॥ १५ ॥
दर्शनाची जिज्ञासा थोर । एरव्हीं नभीं दिसेना कोर ॥
ज्ञाता मग या वेचक्यासमोर । आणोनि नजर लावी म्हणे ॥ १६ ॥
पहा आतां या वेचक्यामधून । समोर होईल चंद्रदर्शन ॥
कोर जरी ती होती लहान । जाहली तेथून दृग्गोचर ॥ १७ ॥
धन्य अंगुष्ट महिमान । वेणीमाधव स्वयें होऊन ॥
गंगा यमुना प्रगटवून । दासगणूतें तुष्टविलें ॥ १८ ॥

---

१ यासाठीं. २ स्तुति. ३ खरें. ४ पंधरवडा.

प्रयागतीर्थीं करावें स्नान । म्हणून मागतां आज्ञापत्र ॥
हा मदंगुष्ट प्रयाग जाण । करी अवगाहन येथेंच ॥ १९ ॥
ऐसें बाबा म्हणतां डोई । दासगणूनें ठेवितां पायीं ॥
गंगा यमुना उभयतोयीं । प्रगटल्या पाही तें ठायीं ॥ २० ॥
ऐसिया त्या प्रसंगावर । दासगणूचें पद तें सुंदर ॥
'अगाध शक्ति अघटित लीलापर' । श्रवण तत्पर जरि श्रोते ॥२१॥
साईसच्चरित चतुर्थाध्यायीं । दासगणू निजवाणी[1] तें गाई ॥
पुनश्च श्रोतां वाचितां ते ठायीं । पुन्हांही नवाई प्रगटेल ॥ २२ ॥
म्हणवूनि शाखाचंद्रन्याय । अंगुष्टीं[2] तर्जनी मध्यमा[3] उभय[4] ॥
ठेवूनि दावी साईमाय । सोपा उपाय निजभक्तां ॥ २३ ॥
म्हणे होऊनि निरभिमान । सर्वांभूतीं[5] खालवा मान ॥
करा एक अंगुष्टध्यान । सोपें साधन भक्तीचें ॥ २४ ॥
आतां पूर्वील कथानुसंधान । जाहलें भक्तानुग्रह कथन ॥
पुढील अपूर्व चरित्र श्रवण । अवधानपूर्ण परिसीजे ॥ २५ ॥
शिरडी जाहलें पुण्य क्षेत्र । बाबांचेंनि तें अति पवित्र ॥
यात्रा वाहे अहोरात्र । येती सत्पात्र पुण्यार्थी ॥ २६ ॥
दाही दिशेसी जयाची साक्ष । पटून राहिली प्रत्यक्ष वा परोक्ष ॥
साईवेषें हा कल्पवृक्ष । अवतरला प्रत्यक्ष शिरडींत ॥ २७ ॥
अकिंचन वा संपत्तिमान । देखे समस्तां समसमान ॥
दावून कांहीं अतर्क्य विंदान । भक्त कल्याण साधी जो ॥ २८ ॥
काय ती निःसीम प्रेमळता । नैसर्गिक ज्ञान संपन्नता ॥
तैसीच आत्यंतिक सर्वात्मभावता । धन्य अनुभविता भाग्याचा ॥२९॥
कधीं दृढ मौन धारण । हेंच जयाचें ब्रह्मव्याख्यान ॥
कधीं चैतन्य आनंदघन । भक्तगण परिवेष्टित ॥ ३० ॥

१ वाणीनें. २ पायाचे आंगठ्यावर. ३ मधलें बोट. ४ दोन्ही. ५ सर्वाभूतिंं

कधीं गूढार्थ ध्वनित बोलणें । कधीं थट्टेनें विनोद करणें ॥
कधीं संदिग्धता सोडून देणें । कातावणें चालावें ॥ ३१ ॥
कधीं भावार्थ कधीं विवेक । कधीं उघडें निश्चयात्मक ॥
असे अनेकीं अनेक । उपदेश देख करीत ते ॥ ३२ ॥
ऐसें हें साई समर्थाचें चरित । मनोबुद्धिवाचातीत ॥
अकळ करणी अकल्पित । अनिर्ज्ञात अवाचित ॥ ३३ ॥
धणी न पुरे मुख अवलोकितां । धणी न पुरे संभाषण करितां ॥
धणी न पुरे वार्ता परिसतां । आनंद चित्ता न समाये ॥ ३४ ॥
मोजूं येतील पर्जन्यधारा । बांधूं येईल मोटे वारा ॥
परी या साईच्या चमत्कारा । कवण मापारा मोजील ॥ ३५ ॥
असो आतां पुढील कथा । सांईची भक्त संरक्षणीं चिंता ॥
तैशीच दुर्धर प्रसंग निवारकता । स्वस्थ चित्ता परिसावी ॥ ३६ ॥
कैसें भक्तांचें गंडांतर । जाणून देत वेळीं धीर ॥
टाळूनि करीत निजपदीं स्थिर । कल्याण तत्पर सर्वदां ॥ ३७ ॥
ये अर्थीची आख्यायिका । रिझवील तुम्हां श्रवणोत्सुकां ॥
वाढवील साईसमागम सुखा । श्रद्धा भाविकां उपजवील ॥ ३८ ॥
असोत हीन दीन बापुडीं । वाढेल साई कथेची आवडी ॥
जपतां साईनाम हरघडी । ढावील परथडी साई त्यां ॥ ३९ ॥
काकासाहेब मिरीकर । निवास शहर अहमदनगर ॥
प्रसन्नपणें जयां सरकार । पाववी सरदार पदवीतें ॥ ४० ॥
चिरंजीवही कर्तव्यतत्पर । कोपरगांवचे मामलेदार ॥
असतां चितळीचे दौऱ्यावर । आले शिरडीवर दर्शना ॥ ४१ ॥
मशीदींत जाऊन बसतां । बाबांचे चरणीं मस्तक ठेवितां ॥
क्षेमकुशळ पुसतां सवरतां । कथावार्ता चालल्या ॥ ४२ ॥

---

१ रागावणें. २ साई समर्थांचें आचरण. ३ मन, बुद्धि व वाणी यांच्या शक्तिपलीकडील. ४ माप करणारा.

होती तेथें वरीच मंडळी । माधवेरावही होते जवळी ॥
कथामृताची ते नवाळी । अवधानशीळीं सेविजे ॥ ४३ ॥
कैसी भावी संकट सूचना । सोपाय तन्निवारण योजना ॥
करून कैसें रक्षीत भक्तजनां । अघटित घटना बाबांची ॥ ४४ ॥
बाबा मिरीकरांस ते ठायीं । पुसती प्रश्न पहा नवलाई ॥
अहो ती आपुली द्वारकामाई । आहेका ठावी तुम्हांतें ॥ ४५ ॥
बाळासाहेबांस हा कांहीं । मुळींच उलगडा झाला नाहीं ॥
तंव बाबा वदती आतां पाहीं । द्वारकामाई ती हीचें ॥ ४६ ॥
हीच आपली द्वारकामाता । मशीदीचे या अंकीं बैसतां ॥
लेंकुरां देई ती निर्भयता । चिंतेची वार्ता नुरेची ॥ ४७ ॥
मोठी कृपाळू ही मशीदमाई । भोळ्या भाविकांची ही आई ॥
कोणी कसाही पडो अपायीं । करील ही ठायींच रक्षण ॥ ४८ ॥
एकदां हिचे जो अंकीं बैसला । वेडा तयाचा पार पडला ॥
साउलींत हीचे जो पहुडला । तो आरूढला सुखासनीं ॥ ४९ ॥
हीच द्वारका द्वारावती । बाबा मग तयांस देती विभूति ॥
अभय हस्त शिरीं ठेविती । जावया निघती मिरीकर ॥ ५० ॥
आणीक वाटलें बाबांचे जीवां । मिरीकरातें प्रश्न पुसावा ॥
ठावा का तुज लांब बावा । आणीक नवलावा तयाचा ॥ ५१ ॥
मग मूठ वाळूनि डावा हात । कोपरापाशीं उजवे हातांत ॥
धरूनि फिरवीत मुखें वदत । ऐसा भयंकर असतो तो ॥ ५२ ॥

---

१ माधवराव देशपांडे अथवा बाबांचा शामा. २ चांगलें लक्ष देणारांनीं. ३ उपायासह. ४ हीच मशीद. ५ संकट, जडभारी. ६ निजावला. ७ चढला. ८ अंगारा, उदी. ९ सर्प.

परी तो काय करितो अपुलें । आपण द्वारकामाईचीं पिलें ॥
कोणा न उमगे तिचें केलें । कौतुक उगलें पहावें ॥ ५३ ॥
द्वारकामाई असतां तारिती । लांव बावा काय मारिती ॥
तारित्या पुढें मारित्याची गती । ती काय किती समजावी ॥५४॥
याच प्रसंगीं हा खुलासा । बावांनी कां करावा ऐसा ॥
मिरीकरांशीं संवंध कैसा । लागली जिज्ञासा सकळिकां ॥ ५५ ॥
बावांस पुसाया नाहीं धीर । तैसेंच चरणीं ठेऊनी शीर ॥
चितळीस जावया झाला उशीर । म्हणून मिरीकर उतरले ॥ ५६ ॥
होते माधवराव वरोवरी । दोघे जों पोहोंचले मंडपद्वारीं ॥
माधवरावांस बावा माघारी । येई क्षणभरी म्हणाले ॥ ५७ ॥
म्हणती शामा तूंही तयारी । करी जाई त्याचे वरोवरी ॥
मारून ये चिथळीची फेरी । मौज भारी होईल ॥ ५८ ॥
तात्काळ शामा खालीं उतरला । मिरीकरां सन्निध आला ॥
म्हणे आपले टांग्यांत मजला । येणें चिथळीला आहे कीं ॥ ५९ ॥
घरीं जाऊन करितों तयारी । हा आलोंच जाणा सत्वरी ॥
बावा म्हणती तुम्हांबरोबरी । चिथळीवरी जावें म्यां ॥ ६० ॥
तयांस वदती मिरीकर । चिथळीपर्यंत इतकें दूर ॥
तुम्हीं येऊन काय करणार । व्यर्थ हा जोजार तुम्हांला ॥ ६१ ॥
माधवराव मागें परतले । जें झालें तें बाबांस कथिलें ॥
बाबा म्हणती वरें झालें । काय कीं हरवलें आपुलें ॥ ६२ ॥
मंत्र तीर्थ द्विज देव । दैवज्ञ वैद्य कीं गुरुराव ॥
यांच्या ठायीं जैसा भाव । तैसाच उद्भव फळाचा ॥ ६३ ॥

---

१ करामत. २ उगी राहून. ३ हा गांव शिर्डीहून गाडीमार्गानें १३ मैल आहे. ४ त्रास, तसदी.

आपण चिंतावें नित्य हित । उपदेशाचा अर्थ विहित ॥
असेल जैसें जयाचे कर्मांत । तैसेंच निश्चित घडेल ॥ ६४ ॥

इतक्यांत मिरीकर शंकले । पाहिजे बाबांचें शब्द मानिले ॥
माधवरावांस हळूच खुणविलें । चला म्हणाले चिथळीला ॥ ६५ ॥

मग ते म्हणती थांबा येतों । पुन्हा बाबांची अनुज्ञा घेतों ॥
हो म्हणतां ते क्षणींच परततों । आतांच येतों माघारा ॥ ६६ ॥

निघालों होतों तुम्ही परतविलें । बाबा म्हणाले बरें झालें ॥
काय आपुलें त्यांत हरवलें । स्वस्थ बसविलें मजलागीं ॥ ६७ ॥

आतां पुनश्च विचार घेतों । हो म्हणतांच सत्वर येतों ॥
म्हणतील जैसें तैसें करितों । दास मी तो आज्ञेचा ॥ ६८ ॥

मग ते जाती बाबाप्रती । म्हणती मिरीकर बोलाविती ॥
चिथळीस मजला सवें नेती । आज्ञा मागती आपुली ॥ ६९ ॥

मग हांसून म्हणती साई । बरें तो नेतो तर तूं जाई ॥
नांव हीचें मशीदमाई । श्रीदास काई घालवील ॥ ७० ॥

आई ती आई बहू मायाळू । लेंकरालागीं अति कनवाळू ॥
परी लेंकरेंच निव्रतां टवाळू । कैसा सांभाळू करी ती ॥ ७१ ॥

मग वंदोनी साई पायां । निघाले माधवराव जाया ॥
मिरीकर होते जया ठाया । तांग्यांत बैसाया पातले ॥ ७२ ॥

उभयतां ते चिथळीस गेले । तपासांतीं हुजूरवाले ॥
येणार परी नाहीं आले । मग ते बैसले निवांत ॥ ७३ ॥

---

१ योग्य. २ संशयांत पडले. ३ परवानगी. ४ अविश्वासी, श्रद्धाविहीन. ५ वरिष्ठ आफिसचे लोक.

मारुतीचे देवालयीं । उतरण्याची होती सोयी ॥
उभयतांही मग ते ठायीं । मयाण लवलाही केलें कीं ॥ ७४ ॥
एक प्रहर झाला निशी । टाकूनि सतरंजी बिछाना उशी ॥
वत्तीचिया उजेडापाशीं । वार्ता पुसीत बैसले ॥ ७५ ॥
वृत्तपत्र होतें तेथ । उघडून मिरीकर वाचूं लागत ॥
नवल विशेषीं लोधलें चित्त । तों नवल विचित्र वर्तलें ॥ ७६ ॥
सर्प एक त्या काळवेळे । कैसा कोठूनि आला नकळे ॥
बैसला करूनियां वेटोळें । चुकवूनि डोळे सकळांचे ॥ ७७ ॥
मिरीकरांचे कंबरेवर । होता उपरण्याचा पदर ॥
तया मृदुल आसनावर । शांत निर्घोर बैसला ॥ ७८ ॥
प्रवेश करितां ओजे ओजे । सुर सुर सुर सुर कागद वाजे ॥
परी न कोणा तया अवाजें । घेणें साजे सर्पशंका ॥ ७९ ॥
इतुका भयंकर जरी प्रसंग । मिरीकर खबरपत्रांत दंग ॥
परी पटेवाल्याचें अंतरंग । कल्पनातरंगीं वाहविलें ॥ ८० ॥
येतो कोठूनि तो अवाज । असावा कशाचा काय काज ॥
म्हणोनि उचलितां वत्ती जूज । लंबूमहाराज देखिले ॥ ८१॥
देखतांच तो घाबरला । सापरेसाप हळूच ओरडला ॥
मिरीकरांचा धीरचि सुटला । कंप सुटला सकळांगा ॥ ८२ ॥
शामरावही चकित झाले । म्हणती बाबा हें काय केलें ॥
नसतें विघ्न कोठूनि धाडिलें । आतां निरसिलें पाहिजे ॥ ८३ ॥
मग पाहूनि ते अवस्था । जयाचें जें जें लागलें हाता ।
तें तें घेऊनि धांवले तत्त्वतां । वाजूं न देतां पदातें ॥ ८४ ॥

१ वर्तमानपत्र. २ गुंग झाले. ३ भयंकर वेळेस. ४ निर्भयपणें. ५ हळूहळू. ६ जरा. ७ लांबबुवा.

तों तो सर्प कंवरेखालता ॥ देखिला हळू हळू सरकतां ॥
सर्प कैंचा ती मूर्त¹ अनर्थता । उतरताहे वाटली ॥ ८५ ॥

पहातां पहातां तें ग्रहण सुटलें । वडगे आधींच होते उचललें ॥
धडाधड ते सर्पावर पडले । जाहले तुकडे तयाचे ॥ ८६ ॥

एणेंपरी अरिष्ट टळलें । पाहूनि मिरीकर अती गहिंवरले ॥
साई समर्थांचिया वरलें । प्रेमें तरतरलें अतितर ॥ ८७ ॥

दुःखाचे शहारे मावळले । प्रेम डोळां वाहूं लागले ॥
केवढें हें अरिष्ट टळलें । कैसें कळलें बाबांना ॥ ८८ ॥

कैसें हें गंडांतर चुकलें । बाबांनीं वेळीं कैसें सुचविलें ॥
नको म्हणतां टांग्यांत बसविलें । शामास दिधलें साह्यार्थ ॥ ८९ ॥

किती तरी दया पोटीं । काय ती त्यांची अंतर्दृष्टि ॥
जाणूनी पुढील वेळ ओखेटी । वार्ता गोमटी कथियेली ॥ ९० ॥

दर्शनाचें महात्म्य दाविलें । मशीदीचें महत्त्व ठसविलें ॥
निजप्रेम निदर्शना आणिलें । सहज लीलें करून ॥ ९१ ॥

एकदां एक मोठे ज्योतिषी । नाना डेंगळे नाम जयांसी ॥
होते श्रीमंत बुट्टीपासीं । म्हणाले तयांसीं तें परिसा ॥ ९२ ॥

आजिचा दिवस अशुभ फार । आहे आपणां गंडांतर ॥
अंतरीं असों द्यावा धीर । असावें फार सावध ॥ ९३ ॥

डेंगळ्यांनीं ऐसें कथितां । बापूसाहेब अस्वस्थ चित्ता ॥
राहून राहून करिती चिंता । दिवस जातां जाईना ॥ ९४ ॥

पुढें मग नित्याचे वेळीं । मशिदीस निघाली मंडळी ॥
बापूसाहेब नानादि सगळी । जाऊनि बैसली बाबाकडे ॥ ९५ ॥

---

१ मूर्तिमंत अनर्थ. २ डवडवले. ३ अतिशयच. ४ वाईट.

तात्काळ बाबा बुट्टीस पुसती । काय हे नाना काय वदती ॥
ते काय तुज माराया वदती । नलगे ती भीती आपणा ॥ ९६ ॥

'कैसा मारतोस पाहूं मार' । न्याल त्यांना देई उत्तर ॥
असो ऐसे झालिया नंतर । पहा चमत्कार पुढील ॥ ९७ ॥

सायंकाळीं बहिर्दिशेस । बापूसाहेब शौचविधीस ॥
गेले असतां शौचकूपास । आला ते समयास साप एक ॥ ९८ ॥

पाहूनियां तें विघ्न भयंकर । बापूसाहेब आले बाहेर ॥
लहानू तयांचा करी जों विचार । दगडानें ठार करूं या ॥ ९९ ॥

लहानू दगड उचलूं जाई । बापूसाहेब करिती मनाई ॥
म्हणती जा काठी घेऊन येई । बरी न घाई ये कामीं ॥ १०० ॥

गडी जों गेला काठीकरितां । सर्प भिंतीवर चढूं लागतां ॥
झोंक जाऊन पडला अवचिता । गेला सरपटता भोकांतुनी ॥ १०१ ॥

तेथून मग तो गेला पळून । उरलें न मारावयाचें कारण ॥
जाहलें बाबांच्या शब्दांचें स्मरण । संकट निवारण उभयत्र ॥ १०२ ॥

असो हा साईसमागम सोहळा । भाग्यें पाहिला जयानें डोळां ॥
तयासी तो स्मरणावेगळा । कदाकाळा करवेना ॥ १०३ ॥

ऐसे ऐशीं प्रत्यंतरें । दावून आकर्षिलीं भक्तांतरें ॥
वर्णूं जातां कागद न पुरे । वर्णन* न सरे कदापि ॥ १०४ ॥

असेंच एक कथांतर । रात्र पडतां दोन प्रहर ॥
प्रत्यक्ष घडलें चावडीवर । बाबांचें समोर तें परिसा ॥ १०५ ॥

---

१ या नांवाचा श्री० बुटीचा शिपाई. २ दुसरी कथा.

* एके दिवशीं याच माधवराव देशपांड्यांना ते शिर्डीस असतां साप चावला. जवळच एक विरोबाचें स्थान आहे व साप चावलेल्या माणसास

कोराळे तालुका कोपरगांव । वतनवाडीचा मूळ गांव ॥
अमीर शक्कर जया नांव । जयाचा भाव साईपदीं ॥ १०६ ॥

जात ग्वाटिक धंदा दलाल । वांद्र्यांत जयाचा बोलबाला ॥
दुखण्यानें गांजला प्रबळ । अति विकळ जाहला ॥ १०७ ॥

पडतां संकट आठवे देव । सोडिली धंद्याची उठाठेव ॥
निरखून सारी देवघेव । ठोकिली धांव शिरडीस ॥ १०८ ॥

कुंती पांच पांडवांची आई । अज्ञात आणि वनवासापायीं ॥
कष्टली जरी अनंत अपायीं । प्रार्थी अपायचि देवातें ॥ १०९ ॥

म्हणे देवा परमेश्वरा । सौख्य द्याजी मागत्यां इतरा ॥
मज द्या निरंतर दुःख परंपरा । पाडी न विसरा तव नामीं ॥ ११० ॥

तेंच कीं देवा माझें मागणें । देणें तरी मज हेंच देणें ॥
होईल मग तव नाम तेणें । अखंड लेणें मम कंठा ॥ १११ ॥

श्रोतां वक्ता अहर्निशी । हेंच कीं मागं साईपाशीं ॥
विसर न व्हावा तव नामाशीं । पायापाशीं ठेवीजे ॥ ११२ ॥

---

तेथें नेऊन टाकलें म्हणजे तो बरा होतो, असा तेथील लोकांचा समज व अनुभवही आहे. त्याप्रमाणें त्यांना पुष्कळ मंडळींनीं तेथें जाण्याविषयीं आग्रह केला. त्यांनीं महाराजांची आज्ञा होईल तसें करूं असें उत्तर दिलें व महाराजांकडे गेले. महाराजांनीं माधवराव खालीं असतांच 'वर चढूं नको' अशी मोठ्यानें आज्ञा केली. माधवराव ती स्वतःलाच आज्ञा आहे असें समजून वर चढले नाहींत; पण ती आज्ञा त्यांना नसून सर्पाच्या विषाला असावी असें वाटतें, कारण तें विष जें चढत चाललें होतें तें त्या क्षणापासून वर चढलें नाहीं. मग पुढें हळूहळू माधवराव महाराजांचे कृपेनें कांहीं उपचार न करितां बरे झाले. याविषयीं दृष्टांत त्यांना एक वर्ष अगाऊ झाला होता.

१ अज्ञातवास. २ संकटें. ३ जो कोणी मागेल त्या दुसऱ्याला. ४ अलंकार.

असो अमीरें केलें नमन। विधियुक्त बाबांचें हस्तचुंबन ॥
व्याधीचेंही सविस्तर निवेदन। दुःख विमोचन प्रार्थिलें ॥ ११३ ॥

जडला जो होता वातविकार। पुसिला तयाचा प्रतिकार ॥
बाबा मग देती प्रत्युत्तर। व्हावें सुस्थिर चावडींत ॥ ११४ ॥

मशीदींतून नेमानें रातीं। बाबा जया चावडीप्रती ॥
एक दिवसा आड जाती। अमीरा वसती ते स्थानीं ॥ ११५ ॥

अमीर गांजले संधिवातें। कुठेंही गावांत सुखानें रहाते ॥
कोराळ्यासही जाऊन पडते। अधिक मानवतें तयांना ॥ ११६ ॥

चावडी ती मलिकंबेरी। जीर्ण झालेली खालींवरी ॥
जेथें सरड पाली विंचू विखारीं। स्वेच्छाचारी नांदावें ॥ ११७ ॥

त्यांतचि वसती रोगी कुष्टी[4]। कुत्रीं तेथेंच खाती उष्टीं ॥
अमीर झाला मोठा कष्टी। चालती न गोष्टी बाबापुढें ॥ ११८ ॥

मागील भागांत भरला कचरा। ढोपरढोपर छिद्रें सतरा ॥
हाल खाईना तयाचे कुत्रा। ती एक यात्राच जन्माची ॥ ११९ ॥

वरून पाऊस खालून ओल। जागा उंचनीच सखोल ॥
वाऱ्याथंडीचा एकचि कल्लोळ। मनासी घोळ अमिराचे ॥ १२० ॥

सांधे धरले शरीराचे। स्थळ तें वाऱ्यापाउसाचें ॥
ओल तों तेथें ऐशापरीचें। औषध बाबांचें वचन कीं ॥ १२१ ॥

तयास बाबांचे ठाम बोल। वारा पाऊस वा असो ओल ॥
जागा उंच नीच वा सखोल। तयाचें तोल करूं नये ॥ १२२ ॥

जरी तें स्थान विकल्पास्पद। साईसमागम महाप्रसाद ॥
तयांचें वचन हेंचि अगद। मानूनि सुखद[10] राहिला ॥ १२३ ॥

---

१ वस्तीचें स्थान. २ फार जुनी. ३ सर्पांनीं. ४ महाव्याधीचे व रक्तपितीचे रोगी. ५ चिंता. ६ बाबांचा शब्द हेंच औषध. ७ विचार. ८ संशयात्मक. ९ औषध. १० सुख देणारे.

चावडी चढतां तेथें समोर । बिस्तरा लावून मध्यावर ॥
नऊ महिने त्या चावडीवर । अमीर शक्कर राहिला ॥ १२४ ॥
अंगीं खिळला संधिवात । अनुपान बाह्यतः सर्व विपरीत ॥
परी अंतरीं विश्वास निश्चित । तेणें यथास्थित जाहलें ॥ १२५ ॥
नऊ महिने तेथेंच वास । नेमिला होता अमीरास ॥
मनाई होती दर्शनास । मशीदीसही यावया ॥ १२६ ॥
परी ती चावडी ऐसें स्थान । दिधलें होतें तयास नेमून ॥
कीं बाबांचें आपाप दर्शन । प्रयासावीण घडतसे ॥ १२७ ॥
तेंही रोज सांज सकाळा । शिवाय एकांतरा दोनी वेळा ॥
तेथें तया चावडीचा सोहळा । मिळे डोळाभर पहावया ॥ १२८ ॥
रोज सकाळीं भिक्षेस जातां । चावडीवरूनच बाबांचा रस्ता ॥
सहज दर्शन जातां येतां । स्थान न सोडितां अमीरास ॥ १२९ ॥
तैसेच रोज अस्तमानीं । चावडीसमोर बाबा येऊनी ॥
तर्जनी मस्तक डोलवूनी । दिग्वंदनीं सन्निष्ठ ॥ १३० ॥
तेथून मग माघारा जात । समाधिगृहाचे कोनापर्यंत ॥
तेथून माघारा मशिदींत । भक्त समवेत ते जात ॥ १३१ ॥
चावडी एका दिसा आड । नावाला एक पडदा आड ॥
दोघांमाजी फळ्यांचें कवाड ॥ दोघांही आवड गोष्टींची ॥ १३२ ॥
तेथेंच पूजा तेथेंच आरती । होऊन भक्तजन घरोघर जाती ॥
तेथून पुढें स्वस्थ चित्तीं । मग ते बोलती परस्पर ॥ १३३ ॥
बाह्यात्कारें बंदिवास । आंतून साईसीं दृढ सहवास ॥
भाग्यावीण हा लाभ इतरास । भोगावयास दुर्मिळ ॥ १३४ ॥

---

१ बिछाना. २ उलट. ३ सायंकाळचे फेरीचे वेळीं. ४ सकाळीं भिक्षेस निघतांना. ५ एक दिवसाआड बाबा चावडींस जात व तेथेंच पूजा आरती होऊन निजत व दुसरे दिवशीं प्रातःकाळीं मशिदींत परत जात तेव्हां. ६ दिशांस अभिवंदन करण्यांत.

तरीही अमीर कंटाळला । एकच स्थानीं रहावयाला ॥
बंदिवासचि तो तया गमला । म्हणे गांवाला जावें कोठें ॥ १३५ ॥
स्वातंत्र्याची हौस मना । त्या काय आवडे परतंत्रपणा ॥
पुरे आतां हा बंदिखाना । उठली कल्पना अमीरा ॥ १३६ ॥
निघाला बाबांच्या अनुज्ञेवीण । त्यागूनि आपुलें नियमित स्थान ॥
गेला कोपरगांवालागून । राहिला जाऊन धर्मशाळे ॥ १३७ ॥
तेथें पहा चमत्कार । मराया टेकला एक फकीर ॥
तृषेनें व्याकूळ होऊन फार । पाजा घोटभर पाणी म्हणे ॥ १३८ ॥
अमीरास आली दया । गेला पाणी पाजावया ॥
पाणी पीताक्षणीं ते ठाया । पडली काया निचेष्टित ॥ १३९ ॥
झालें तयाचें देहावसान । जवळपास नाहीं कोण ॥
त्यांतही रात्रीचा समय पाहून । गडबडलें मन अमीराचें ॥ १४० ॥
प्रातःकाळीं भरेल ज्यूरी । त्या आकस्मिक मरणावरी ॥
होईल सुरू धराधरी । तपास करील सरकार ॥ १४१ ॥
घडलेली वार्ता जरी खरी । सकृद्दर्शनीं कोण निर्धारी ॥
निकाल साक्षी पुराव्यावरी । ऐसी ही परी न्यायाची ॥ १४२ ॥
मीच यातें पाणी पाजितां । फकीर अवचित मुकला जीविता ॥
ऐसी सत्यवार्ता मी वदतां । लागेन हाता आयताच ॥ १४३ ॥
माझाच संबंध येईल आधीं । धरितील मजलाचि या संबंधीं ॥
पुढें ठरतां मरणाची ऑदी । मी निरपराधी ठरेन ॥ १४४ ॥
परी ते ठरेपर्यंतचा काल । जाईल दुःसह होतील हाल ॥
तैसाच आल्यावाटेनें पळ । काढावा तात्काळ हें ठरलें ॥ १४५ ॥
म्हणोन अमीर रातोरात । निघाला तेथून कोणा न देखत ॥
पुढें जातां मागें पाहत । अस्वस्थचित्त मार्गांत ॥ १४६ ॥

१ त्या फकीराचा देह. २ एकदम. ३ ती खरी म्हणून अमीरावर कोण विश्वास ठेवणार ? ४ आदिकारण खरें कारण.

चावडी कैसी येते हातीं । मनास तोंवर ना निश्चिती ॥
ऐसा अमीर शंकितवृत्ती । शिरडीप्रती चालला ॥ १४७ ॥
म्हणे बाबा हें काय केलें । काय कीं हें पाप ओढवलें ॥
माझेंच कर्म मजला फळलें । तें मज कळलें संपूर्ण ॥ १४८ ॥
सुखालागीं सोडिली चावडी । म्हणून माझी तोडिली खोडी ॥
असो आता या दुःखांतूनि काढी । नेऊनि शिरडींत घालीगा ॥१४९॥
केली तयारी हातोहात । अमीर निघाला रातोरात ॥
टाकून तेथें तैसेंच प्रेत । धर्मशाळेंत त्या रात्रीं ॥ १५० ॥
बाबा बाबा मुखें वदत । क्षमाकरा करुणा भाकित ॥
पातला जेव्हां चावडीप्रत । जाहला स्वस्थ चित्तांत ॥ १५१ ॥
एवंच हा तरी एक धडा । तेथून कानास लाविला खडा ॥
अमीर वर्तूं लागला पुढां । सोडून कुडा कुमार्ग ॥ १५२ ॥
असो विश्वासें गूण आला । वातापासून मुक्त झाला. ॥
पुढें कैसा प्रसंग पातला । प्रकार घडला तो ऐका ॥ १५३ ॥
चावडी अवघे तीन खण । अग्नई कोण बाबांचें ठिकाण ॥
चहूं बाजूंनीं फळ्यांचें वेष्टण । करिती शयन तैं बाबा ॥ १५४ ॥
अवघी रात्र वऱ्या तेवंती । सदैव उजेडांत निजती ॥
फकीर फुकरे बाहेर बैसती । बाह्य प्रदेशीं अंधार ॥ १५५ ॥
अमीर जणूं त्यांतचि एक । आजूबाजूस इतर लोक ॥
तेही लवंडती तेथचि देख । ऐसे कैक ते असती ॥ १५६ ॥
तेथेंच बाबाचे पश्चाद्भागीं । सरसामान कोठीचे जागीं ॥
भक्त अबदुल परम विरागी । सेवेस निजांगीं तत्पर ॥ १५७ ॥

---

१ पेठती.

ऐसें असतां मध्यरात्रीशीं । बाबा आक्रंदत अबदुल्लासीं ॥
म्हणती माझिया बिछान्याचे कुशी । पाहा रे बिरेंशी आदळली ॥१५८॥
हाकेंपाठीं हाक देती । अबदुल पातला बत्ती हातीं ॥
बाबा आक्रंदें तयास म्हणती । आतां होतीना ती येथें ॥ १५९ ॥
अबदुल म्हणे सारें पाहिलें । येथें न कांहींच दृष्टीस पडलें ॥
बाबा म्हणती उघडून डोळे । नीट सगळें देखे रे ॥ १६० ॥
पाही अबदुल फिरफिरून । बाबा सटक्यानें ताडिती जमीन ॥
बहिर्निद्रिस्त सकळ जन । जागृत होऊनी अवलोकिती ॥ १६१ ॥
जागा झाला अमीर शक्कर । म्हणे हा आज काय कहार ॥
हे अपरात्रीं सटक्याचे प्रहार । होतात वरचेवर कां बरें ॥ १६२ ॥
पाहूनि ही बाबांची लीला । अमीर तात्काळ मनीं तरकला ॥
विखार कोठें तरी प्रवेशला । कळोनि आला बाबांस ॥ १६३ ॥
तयास बाबांचा फार अनुभव । ठावा तयास बाबांचा स्वभाव ॥
आणि तयांच्या बोलण्याची माव । त्याणें हें सर्व जाणलें ॥ १६४ ॥
अरिष्ट जेव्हां भक्तांचे उशाशीं । म्हणतील बाबा तें अपुले कुशीशीं ॥
भाषा ही अवगत अमीराशीं । तेणें हें मनाशीं ताडिलें ॥ १६५ ॥
इतक्यांत त्याच्याच उशाकडे । कांहीं विळविंळतां दृष्टी पडे ॥
'अबदुल बत्ती रे बत्ती इकडे' । म्हणून ओरडे अमीर ॥ १६६ ॥
बत्ती आणितांच बाहेर । पसरलें दिसलें वेटोळें थोर ॥
प्रकाशें तो दीपला विखार । मान खाली वर करीतसे ॥ १६७ ॥
तेथेंच केली तयाची शांती । बाबांचे महदुपकार मानिती ॥
म्हणती काय ही विलक्षण पद्धती । देती जागृती कैसी कीं ॥१६८॥

१ ओरडूं लागले. २ भूत. ३ मोठ्यानें. ४ हातांतला लहान दंडूका. ५ गडबड. ६ सर्प. ७ हालतां.

कैंची विवशी कैंची वत्ती । काळवेळेची द्यावी जागृती ॥
निजभक्तांची संकट निर्मुक्ति । हेच युक्ति ते होती ॥ १६९ ॥

ऐशा सर्पाच्या अगणीत कथा । येतील बाबांच्या चरित्रीं वर्णितां ॥
होईल ग्रंथाची अति विस्तारता । म्हणून संक्षेपता आदरिली ॥ १७०

'सर्प विंचू नारायण' । साधू तुकारामाचें वचन ॥
'परी ते सर्व वंदावे दुरून' । हेंही वचन तयांचें ॥ १७१ ॥

तेच म्हणतीं तयां 'अधम' । तयां 'पैजारीचें काम' ॥
तयां संबंधें वर्तनक्रम । कळेना ठाम निर्बंध ॥ १७२ ॥

जयाचा जैसा स्वभावधर्म । तदनुसार तयाचें कर्म ॥
जैसा ईश्वरी नेमानेम । हेंचि कीं वर्म तेथील ॥ १७३ ॥

या शंकेचें समाधान । बाबापाशीं एकच जाण ॥
जीवमात्र समसमान । अहिंसा प्रमाण सर्वार्थीं ॥ १७४ ॥

विंचू काय सर्प काय । ईश्वरचि सर्वांचा ठाय[१] ॥
तयाची इच्छा नसतां अपाय । करवेल काय त्यांचेनीं ॥ १७५ ॥

हें विश्व अवघें ईश्वराधीन । स्वतंत्र येथें कांहींचही न ॥
हें बाबांचें अनुभवज्ञान । आम्हां दुरभिमान सोडीना ॥ १७६ ॥

तळ्यांत पडला विंचू तळमळी । खालीं जातां पाण्याचे तळीं ॥
एक आनंदें वाजवी टाळी । म्हणे तूं छळिसी ऐसाच ॥ १७७ ॥

एक ऐकुनिया ती टाळी । धांवत आला तळ्याचे पाळीं ॥
पाहूनि विंचू खातां गंटगळी । करुणा वहाली कळवळे ॥ १७८ ॥

मग तो जाऊनि तयाजवळी । हळूच चिमटींत विंचू कवटाळी ॥
तेणें जाति स्वभावें उसळी ॥ मारूनि अंगुळी डंखिली ॥ १७९ ॥

१ अधिष्ठान.

येथें काय आलुचें ज्ञान । आन्हीं सर्वथैव पराधीन ॥
बुद्धिदाता नारायण । घडवील आपण तें त्वरें ॥ १८० ॥
अनेकांचे अनेक अनुभव । मीही कथितों निजानुभव ॥
साईवचन विश्वास गौरव । केवळ वैभव निष्ठेचें ॥ १८१ ॥ ॥
जैसें काकासाहेब दीक्षित । दिवसा वाचित नाथ भागवत ॥
तैसेच ते प्रतिरात्रीं नित[1] । रामायण भावार्थ[2] वाचीत ॥ १८२ ॥
टळेल देवावरचें फूल । टळेल एकवेळ अंघोळ ।
टळेल इतर नेम सकळ । वाचन वेळ अटळ तो ॥ १८३ ॥
हे दोन्हीं ग्रंथ नाथांचे । सार सर्वस्व परमार्थाचें ॥
समर्थ साईच्या अनुग्रहाचे । द्योतक सारें दीक्षितां ॥ १८४ ॥
या अद्वितीय गोड ग्रंथीं । आत्मज्ञान वैराग्य नीती ॥
यांची अखंड त्रिगुण ज्योती । दिव्यदीप्ति प्रकाशे ॥ १८५ ॥
यांतील बोधामृताचा प्याला । जया सभाग्याने[3] ओठास लागला ॥
तयाचा त्रिताप एकसरा शमला । मोक्ष लागला पायानें ॥ १८६ ॥
साईकृपें दीक्षिताला । श्रवणासी श्रोता व्हावा झाला ॥
योग भागवत श्रवणाचा आला । उपकार झाला मज तेणें ॥ १८७॥
जाऊं लागलों दिवस रात्र । ऐकावया त्या कथा पवित्र ॥
भाग्यें उघडलें श्रवणसत्र । पावन श्रोत्र तेणेंनीं ॥ १८८ ॥
असो ऐसी एक रात्र । कथा चालतां परम पवित्र ॥
आडकथा जी घडली विचित्र । श्रोता तें चरित्र ऐकिजे ॥ १८९ ॥
काय करूं एक वानितां । मध्येंच दुसरें स्फुरे चित्ता ॥
जाणोनि तयाची श्रवणार्हता । किमर्थ उपेक्षिता होऊं मी ॥ १९० ॥
चालली सुरस रामायणी कथा । पटली मातेची खूण हनुमंता[4] ॥
तरी कसं जाई स्वामीची समर्थता । अंतीं अनर्थता भोगिली ॥१९१॥

१ नित्य. २ भावार्थ रामायण (एकनाथमहाराजकृत). ३ भाग्यवानाच्या. ४ रामायणांतील एक कथा.

लागतां रामबाण पिच्छाचा वारा । हनुमंत अंबरीं फिरे गरगरा ॥
प्राण कासावीस घाबरा । पितां ते अवसरा पावला ॥ १९२ ॥
ऐकोनी तयाचें हितवचन । हनुमंत रामासीं आला शरण ॥
होत असतां या भागाचें श्रवण । घडलें विलक्षण तें ऐका ॥ १९३ ॥
चित्त कथाश्रवणीं संलग्न । श्रवणानंदीं सकळ मग्न ॥
तों एक वृश्चिक मूर्त विघ्न । कैसें कीं उत्पन्न जाहलें ॥ १९४ ॥
नकळे तया ही काय आवडी । नकळत माझिया स्कंधीं उडी ॥
मारिली देऊनि बैसला दडी । रस सुखोडी चाखीत ॥ १९५ ॥
येथेंही पहा बाबांची साक्ष । माझें नव्हतें तिकडे लक्ष ॥
परी जो हरिकथेसीं दक्ष । तया संरक्षक हरि स्वयें ॥ १९६ ॥
सहज गेली माझी नजर । पाहूं जातां विंचू भयंकर ॥
माझिया दक्षिण स्कंधावर । उपरण्यावर सुस्थिर ॥ १९७ ॥
नाहीं चलन ना वलन । स्वस्थचित्त दत्तावधान ॥
श्रोताच जणुं श्रवण परायण । स्वस्थ निजासन विराजित ॥ १९८ ॥
उगीच देह स्वभावानुसार । नांगीस चाळवितां लवभार ॥
तरी बैसाया देता न थार । दुखः अनिवार वितरिता ॥ १९९ ॥
रामकथेचा होता रंग । श्रोते वक्ते पोथींत दंग ॥
सकळांचा करिता रसोभंग । ऐसा हा कुसंग दुर्धर ॥ २०० ॥
रामकथेचा हाचि महिमा । विघ्नांचा तेथें न चले गरिमा ॥
तियें पावावें लागे उपरमा । निजधर्मा विसरूनी ॥ २०१ ॥
रामकृपेनें लाधलों बुद्धि । हळूच दूर टाकावी उपाधी ॥
विसंबूं नये तो चंचलधी । परमावधी होई तों ॥ २०२ ॥
होतें जें उपरणें पांघुरलें । हळूच दोबाजू सांवरिलें ॥
आंत विंचूस दृढ गुंडिलें । नेऊनी पसरिलें बागेंत ॥ २०३ ॥

१ वायू. २ कथारसाची गोडी. ३ देता. ४ प्रभाव. ५ चंचल बुद्धीचा प्राणी. ६ गुंडाळिलें.

विंचू जात्याच भयंकर । वेळीं जाईलही जातीवर ॥
भय खरें परी बाबांची आज्ञाही सधर । मारावया कर धजेना ॥ २०४ ॥
येथें श्रोतियां सहजी शंका । विंचू घातकी वध्य नव्हे कां ॥
डंखितां देईल कां तो सुखा । मारूं नये कां न कळे कीं ॥ २०५ ॥
सर्प विंचू विषारी प्राणी । नुपेक्षी तयां कदा कोणी ॥
बाबा काय तया लागोनी । द्यावें सोडूनि म्हणतील ॥ २०६ ॥
श्रोतियांची शंका खरी । माझीही होती तीच परी ॥
परी पूर्वील ऐसिया प्रसंगाभीतरी । परिसा वैखरी बाबांची ॥ २०७ ॥
प्रश्न होता याहून विकट । शिरडींत काकांचे वाडिया प्रकट ॥
एकदां माडीवर खिडकी निकट । विखार बिकट आढळला ॥ २०८ ॥
चौकटीतळीं छिद्रद्वारें । भीतरीं प्रवेश केला विखारें ॥
दीपला दीपज्योती निकरें । वेटोळें करुनि बैसला ॥ २०९ ॥
दीपप्रकाशें जरी दीपला । मनुष्याच्या चाहुले बुजला ॥
गजबज झाली तैसा चमकला । क्षणैक उगला राहिला ॥ २१० ॥
मागें न जाई पुढें न येई । खालीवर करी डोई ॥
मग एकचि उडाली घाई । कैशा उपायीं मारावा ॥ २११ ॥
कोणी बडगा कोणी काठी । घेऊनि आले उठाउठीं ॥
जागा सांकड तयासाठीं । बहुत कष्टी जाहले ॥ २१२ ॥
सहज मारिता एक सर[1]पटी । आणि उतरतां भिंती तळवटीं ॥
प्रथम गांठिता माझीच वळे[2]कटी । महत्संकटीं टाकिता ॥ २१३ ॥
लागला वर्मी तरी तो घाव । चुकतां डंख धरितां अपाव ॥
बत्ती आणूनि लक्षिती ठाव । तंव त्या ठा[3]व सांपडला ॥ २१४ ॥
त्याची आली नव्हती वेळ । आम्हा सकळांचें दैवही सबळ ॥
होती जरी ती काळवेळ । केला प्रतिपाळ बाबांनीं ॥ २१५ ॥

१ सरपटणें. २ बिछान्याची वळकटी. ३ जागा.

आल्या मार्गें करूनि त्वरा । निघून गेला तो झरझरा ॥
स्वयें निर्भय निर्भय इतरां । सुख परस्परां वाटलें ॥ २१६ ॥
मग मुक्ताराम[1] उठला । म्हणे विचारा बरा सुटला ॥
नसता त्या छिद्राद्वारें निसटला । होता मुकला प्राणाला ॥२१७॥
मुक्तारामाची दयार्द्र दृष्टी । पाहोनी झालों मी मनीं कष्टी ॥
काय कामाची दया दुष्टीं[2] । चालेल सृष्टी कैसेनीं ॥ २१८ ॥
मुक्ताराम ये कदाकाळीं[3] । आम्हीं वसूं तैं सांज सकाळीं ॥
माझी तों वळकटी खिडकी जवळी । मर्जी ते बोली नावडली ॥ २१९ ॥
पूर्वपक्ष त्यानें केला । उत्तरपक्ष म्यां उचलिला ॥
एकची वाद मातून राहिला[4] । निर्णय ठेलों तैसाच ॥ २२० ॥
एक म्हणे सर्प मारावा । क्षण एकहि न उपेक्षावा ॥
दुजा म्हणे निरपराध जीवा । कां दुष्टावा करावा ॥ २२१ ॥
एक मुक्तारामाचा धिःकार । एक माझा पुरस्कार ॥
वाद वळावला परस्पर । अंतपार येईना ॥ २२२ ॥
गेले मुक्ताराम खालीं । म्यां अपुली जागा बदलली ॥
छिद्रास एक गुडदी बसविली । वळकटी पसरली निजावया ॥२२३॥
डोळे लागले पेंगावया । मंडळी गेली निजावया ॥
मीही देऊं लागलों जांभया । वाद अपैसया[5] थांबला ॥ २२४ ॥
रात्र सरली उजाडलें । शौच मुखमार्जन आटोपलें ॥
बाबा लेंडीवरून परतले । लोक जमले मशीदी ॥ २२५ ॥
नित्याप्रमाणें प्रातःकाळीं । आलों मशीदीस नित्याचे वेळीं ॥
मुक्तारामादि सर्व मंडळी । आली बसली स्वस्थानीं ॥ २२६ ॥

---

१ या नांवाचा बाबांचा एक भक्त होता. २ दुष्ट प्राण्यांच्या संबंधें. ३ कधींतरी. ४ राहिला. ५ आपोआप.

कोणी हातावर तमाखू चुरिती । कोणी बाबांची चिलीम भरिती ॥
कोणी तें हातपाय दाबिती । सेवा ये रीतीं चालली ॥ २२७ ॥

बाबा जाणती सकळांच्या वृत्ती । मग तें हळूच प्रश्न पुसती ॥
वादावादी ती काय होती । ती गतरातीं वाड्यांत ॥ २२८ ॥

मग मी जें जें जेसें घडलें । तेसें तेसें बाबांस कथिलें ॥
मारावें वा न मारावें पुसिलें । सर्पास वहिले ये स्थिति ॥ २२९ ॥

बाबांची तों एकचि परी । सर्प विंचू झाले तरी ॥
ईश्वर नांदे सर्वांभीतरीं । प्रेमचि धरी सर्वार्थीं ॥ २३० ॥

ईश्वर जगाचा सूत्रधारी । तयाच्या आज्ञेंत वर्तती सारीं ॥
हो का विखार विंचू तरी । आज्ञेबाहेरी वर्तेना ॥ २३१ ॥

म्हणवूनि प्राणीमात्रावरी । प्रेम आणि दयाच करी ॥
सोडी साहस धरी सबूरी । रक्षिता श्रीहरी सकळांतें ॥ २३२ ॥

येणें परि कितीशा कथा । साई बाबांच्या येतील सांगतां ॥
म्हणवून यांतील सारचि तत्त्वतां । निवडूनि श्रोतां घ्यावें कीं ॥२३३॥

पुढील अध्याय याहून गोड । भक्ति श्रद्धेचि ती जोड ॥
भक्त दीक्षित[1] प्रसंग अवघड । निघतील बोकड मारावया ॥ २३४ ॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साईसमर्थ सच्चरिते । अपमृत्यु निवारणं नाम
द्वाविंशोध्यायः ॥

श्री सद्गुरू साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

---

१ श्री० हरी सिताराम दीक्षित.

## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची छपाई व खर्चवेच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एकादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यामधून निदान एक तरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रितीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

## विनंति.

या पुढें श्री साईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

श्री साईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे. व्ही पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे.

## नोटीस.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांच्या नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

गोविंद रघुनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला ऑफीस. ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें बी. बी. रेल्वे.